सत्यमेव जयते

प्रधान मंत्री
Prime Minister

नवी दिल्ली
९ श्रावण, शक संवत् १९४५
३१ जुलै, २०२३

प्रिय रश्मी सुनील पवार,

माझे प्रेमळ आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत. 'परीक्षा पे चर्चा' मध्ये सहभागी झाल्याबद्दल आणि त्यावर तुमचे विचार मांडल्याबद्दल धन्यवाद. तुमच्यासारख्या तरुण नागरिकांचे विचार जाणून आणि समजून घेणे नेहमीच प्रोत्साहन देणारे असते.

आजच्या तरुण पिढीची ऊर्जा, आत्मविश्वास आणि क्षमता पाहून मला खूप अभिमान वाटतो. राष्ट्राच्या अपेक्षा आणि आकांक्षा त्याच्या युवाशक्तीशी घट्टपणे जोडलेल्या आहेत.

आज तरुणांसाठी असंख्य पर्याय आणि संधी खुल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, नवोपक्रम, क्रीडा किंवा स्टार्टअप्स असोत, भविष्य घडवण्यासाठी निवडलेल्या कोणत्याही क्षेत्रात सुविधा आणि संसाधनांची अजिबात कमतरता नाही.

पुढील 25 वर्षे हा भारतासाठी अमृत काळ असणार आहे, एक गौरवशाली, विकसित आणि सर्वसमावेशक राष्ट्र निर्माण करण्याचा संकल्प घेऊन पुढे जाण्याचा हा काळ आहे. तुमचे शिक्षण, करिअर, व्यक्तिमत्व विकास आणि चारित्र्य घडवण्याच्या दृष्टीनेही ही 25 वर्षे अत्यंत महत्त्वाची असणार आहेत. जसजसे तुम्ही तुमचे भविष्य घडवत जाल, तसतसे देशाचे भविष्यही नवी दिशा गाठेल.

भारताची युवाशक्ती आपल्या वैयक्तिक ध्येयांची राष्ट्रीय प्रगतीशी सांगड घालून देशाला प्रगतीच्या उच्च शिखरावर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, याचा मला विश्वास आहे.

आयुष्याच्या प्रत्येक परीक्षेत तुम्ही यशस्वी व्हाल अशा विश्वासासह मी तुम्हाला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देतो.

आपला,

नरेंद्र मोदी

(नरेंद्र मोदी)

Pariksha Pe Charcha 2023

MH-S-086621

PDF Scanner ACE Scanner